2 8 OCT 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'रिलायन्स'कडून विद्यापीठातील सुविधांची पाहणी

## अधिकारी, प्राध्यापकांसमवेत चर्चा : संशोधकांची भेट महत्त्वपूर्ण ठरेल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या रिलायन्स टेक्नॉलॉजी ग्रुपच्या संशोधन व विकास केंद्राच्या संशोधकांनी शुक्रवारी शिवाजी विद्यापीठास भेट देऊन येथील संशोधकीय सुविधांची पाहणी केली.

यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या सर्वच विज्ञान शाखांमध्ये आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानविषयक संशोधन सुरु आहे. रिलायन्स उद्योग समूहाचे संशोधन व विकास केंद्र ज्या प्रकल्पांवर काम करीत आहे, त्यातील बहुतेक क्षेत्रांमध्ये शिवाजी विद्यापीठात संशोधन कार्य सुरु आहे. त्यामुळे भविष्यात विद्यापीठ आणि रिलायन्स उद्योग समूह यांच्यातील संशोधन साहचर्य अधिकाधिक विकसित होत जाण्याच्या दृष्टीने या संशोधकांची शुक्रवारची भेट अत्यंत महत्त्वाची ठरेल. यावेळी समूहाचे उपाध्यक्ष डॉ. नटराजन वेंकटेश्वरन, उपाध्यक्ष सुरेश अय्यंगार, संशोधक डॉ. प्रथमेश साळवी, ऑपरेशन्स मॅनेजर रंजना काठवटे, विद्यापीठाचे प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता प्रा. पी. एस. पाटील, ए. एम. गुरव, जी. एस. गोकावी, व्ही. जे. फुलारी, ए. व्ही. घुले, ज्योती जाधव, जी. बी. कोळेकर, पी. व्ही. अनभुले, डी. एस. भांगे, जे. बी. यादव, एन. एस. देशपांडे उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले.. प्रा. एस. एस. कोळेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. बी. सादळे यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठास रिलायन्सच्या संशोधकांनी भेट दिली. यावेळी रिलायन्सच्या टेक्नॉलॉजी ग्रुपचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. संजीव कट्टी यांनी संशोधनाबाबत चर्चा केली. शेजारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

### विकास प्रकल्पांवर भर

नवसंशोधन आणि नवनिर्मिती या बळावर देशातील युवकांना आयपी युजर नव्हे, तर आयपी क्रिएटर म्हणून जागतिक ओळख प्रदान करण्यासाठी समूह प्रयत्न करीत आहे. हे संशोधन कार्य अधिक मजबूतरीत्या व संघटितपणे चालावे, यासाठी प्रायोजित संशोधन प्रकल्प व सह-संशोधन विकास प्रकल्प राबविण्यावर समूहाने भर देण्याचे ठरविले असल्याचे रिलायन्स टेक्नॉलॉजी ग्रुपचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. संजीव कट्टी यांनी सांगितले.

2 8 OCT 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रिलायन्सचे युवकांना जागतिक ओळख देण्याचे काम

## डॉ. संजीव कट्टी : रिलायन्सच्या संशोधक टीमची विद्यापीठास भेट

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** सर्वसामान्य व्यक्ती डोळ्यांसमोर ठेवून रिलायन्स उद्योग समूहात संशोधनाचे कार्य चालते. त्यामुळे समूह अनेक क्षेत्रांत जागतिक स्तरावर अग्रगण्य कामगिरी बजावत आहे. नवसंशोधन व नवनिर्मिती या बळावर देशातील युवकांना जागतिक ओळख प्रदान करण्यासाठी समूह प्रयत्नरत आहे, अशी माहिती रिलायन्स टेक्नॉलॉजी ग्रुपचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. संजीव कट्टी यांनी दिली. रिलायन्स इंडस्ट्रिजच्या रिलायन्स टेक्नॉलॉजी ग्रुपच्या संशोधन व विकास केंद्राच्या शास्त्रज्ञांनी शिवाजी विद्यापीठास भेट देऊन येथील संशोधकीय सुविधांची पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. कट्टी म्हणाले, संशोधन कार्य मजबूतरीत्या व संघटितपणे चालावे, यासाठी प्रायोजित संशोधन प्रकल्प व सहसंशोधन विकास प्रकल्प राबवण्यावर समूहाने भर देण्याचे ठरवले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शैक्षणिक क्षेत्रातील संशोधनाचे औद्योगिक उपयोजन झाल्यानंतरच देशात विकास प्रवर्तनास सुरुवात होईल. विद्यापीठाच्या सर्वच विज्ञान शाखांत आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानविषयक संशोधन सुरू आहे. या कार्याला यूजीसी, डीएई यासारख्या प्रथितयश वित्तीय संस्थांकडून आर्थिक पाठबळ लाभले आहे. या संशोधनाचा समाजाला लाभ होण्यासाठी विद्यापीठे, वित्तीय संस्था यांच्यासह उद्योग क्षेत्र असा त्रिकोण विकसित होण्याची गरज आहे. रिलायन्सचे संशोधन व विकास केंद्र ज्या प्रकल्पांवर काम करत आहे, त्यातील बहुतेक क्षेत्रांत शिवाजी विद्यापीठात संशोधन कार्य सुरू आहे. त्यामुळे भविष्यात शिवाजी विद्यापीठ आणि रिलायन्स उद्योग समूह यांच्यातील संशोधन सहचर्य विकसित होण्याच्या दृष्टीने या टीमची भेट महत्त्वाची ठरेल.

समूहाचे उपाध्यक्ष डॉ. नटराजन वेंकटेश्वरन, उपाध्यक्ष सुरेश अय्यंगार, संशोधक डॉ. प्रथमेश साळवी, ऑपरेशन्स मॅनेजर रंजना काठवटे यांच्याबरोबर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता प्रा. पी. एस. पाटील, प्रा. ए. एम. गुरव, प्रा. जी. एस. गोकावी, प्रा. व्ही. जे. फुलारी, प्रा. ए. व्ही. घुले, प्रा. ज्योती जाधव, प्रा. जी. बी. कोळेकर, प्रा. पी. व्ही. अनभुले, डॉ. डी. एस. भांगे, डॉ. जे. बी. यादव, डॉ. एन. एस. देशपांडे आदी उपस्थित होते. प्रा. एस. एस. कोळेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. बी. सादळे यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठास रिलायन्सच्या संशोधक टीमने भेट दिली. यावेळी बैठकीत बोलताना रिलायन्सच्या टेक्नॉलॉजी ग्रुपचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. संजीव कट्टी. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 OCT 2017
सकाळ



कोल्हापूर : यळगूड येथील रेशीम प्रकल्प भेटीप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. ए. डी. जाधव.

# डॉ. विलास नांदवडेकर यांची रेशीम शेती प्रकल्पांना भेट

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी नुकतीच यळगूड परिसरातील रेशीम शेती प्रकल्पांना भेटी दिल्या. प्राणिशास्त्र अधिविभागातील रेशीम तज्ज्ञ डॉ. ए. डी. जाधव प्रमुख उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या खास मागणीस्तव प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, डॉ. जाधव, डॉ. एम.व्ही. शांताकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमच एक वर्ष कालावधीचा रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रम २०१७ पासून सुरू केला असून, त्यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे. उपक्रमास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, डॉ. नांदवडेकर यांनी विशेष बाब म्हणून मान्यता दिली. या अनुषंगाने डॉ. नांदवडेकर यांनी यळगूड परिसरातील शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष शेतामध्ये जावून संवाद साधला. आप्पासाहेब झुंजार, विश्वास खोत, राजेंद्र बागल, महावीर वसवाडे, श्री. जगताप यांच्या रेशीम शेतीला भेट दिली व प्रत्यक्ष तुती लागवडीपासून कोष निर्मितीपर्यंत अभ्यासपूर्वक हितगुज केले. प्रयोगशाळेतील तंत्रज्ञान प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोचल्यास रेशीम शेती ही शेतकऱ्यांना लक्षाधीश करणारीच ठरते. यापुढे शेतकरीहितार्थ अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जातील. यशस्वी लखपती शेतकऱ्यांचा यथार्थ गौरव केला जाईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी एम. टेक. स्थापत्य अभियांत्रिकीची प्रकल्प राबविणारी विद्यार्थिनी तेजस्विनी जाधव, डॉ. जाधव, प्रा. अत्तार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 OCT 2017
तरुण भारत

# अधिसभा निवडणुकीसाठी ९१२ अर्जांची विक्री



प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अधिसभेची निवडणूक १७ नोव्हेंबर रोजी होणार आहे. यासाठी विद्यापीठ प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. शुक्रवारी शिवाजी विद्यापीठ अधिसभा निवडणुकीसाठी एकूण ९१२ अर्जांची विक्री झाली.

अधिसभा निवडणुकीसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा या तिन्ही जिल्ह्यात ३३ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात ११ मतदान केंद्रांचा समावेश आहे. कोल्हापूर शहरात सायबर कॉलेज, शहाजी कॉलेज, कॉमर्स कॉलेज या तीन केंद्रावर मतदान होणार आहे. शुक्रवारपर्यंत अधिसभा निवडणुकीसाठी एकूण ९१२ अर्जांची विक्री झाली होती. प्राचार्यसाठी १, व्यवस्थापन प्रतिनिधी १, शिक्षक २, नोंदणीकृत पदवीधर १२, विद्यापरिषद शिक्षक ३ व अभ्यासमंडळे विभागप्रमुखासाठी ११ अर्जांची विक्री करण्यात आली.

दरम्यान, सध्या अर्ज विक्री व जमा करून घेण्यासह इतर कामकाजामध्ये विद्यापीठ प्रशासन व्यस्त आहे. अधिसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून ३१ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरावयाचे आहेत. २ नोव्हेंबरला उमेदवारी अर्जांची छाननी तर ४ नोव्हेंबरला उमेदवारी अर्ज माघार घेण्याची अंतिम मुदत आहे. दरम्यान, दि. २८ व २९ रोजी विद्यापीठाला सुटी राहणार असल्याचे कळवण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 OCT 2017
पुण्यनगरी

# सिनेटसाठी ९१२ अर्जांची विक्री

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेसह अन्य अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी शुक्रवारपर्यंत विविध गटांतून ३० अर्ज दाखल झाले आहेत. एकूण ९१२ अर्जांची विक्री झाली. शुक्रवारपर्यंत प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून प्रत्येकी एक, शिक्षक गटातून दोन, नोंदणीकृत पदवीधरमधून बारा, अभ्यास मंडळे-विभागप्रमुख गटातून अकरा आणि विद्या परिषद-शिक्षक गटासाठी तीन उमेदवारी अर्ज दाखल झाले. विविध गटांसाठी शुक्रवारपर्यंत एकूण ९१२ अर्जांची विक्री झाली आहे. शनिवारी आणि रविवारी विद्यापीठाच्या कार्यालयास सुटी असल्याचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 OCT 2017
लोकमत

# विद्यापीठ अधिसभा निवडणुकीसाठी ३० अर्ज दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेसह अन्य अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी शुक्रवारपर्यंत विविध गटांतून ३० अर्ज दाखल झाले आहेत.

यामध्ये प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून प्रत्येकी एक, शिक्षक गटातून दोन, नोंदणीकृत पदवीधरमधून बारा, अभ्यास मंडळे-विभागप्रमुख गटातून अकरा आणि विद्या परिषद-शिक्षक गटासाठी तीन उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. शुक्रवारपर्यंत एकूण ११२ अर्जांची विक्री झाली आहे. आज, शनिवारी, उद्या, रविवारी विद्यापीठाच्या कार्यालयास सुटी राहणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 OCT 2017
पुढारी

# विद्यापीठ निवडणुकीसाठी ३० उमेदवारी अर्ज दाखल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी विविध गटांत तीस उमेदवारी अर्ज दाखल झाले. दरम्यान, आजअखेर एकूण ९१२ उमेदवारी अर्जांची विक्री झाली असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी सोमवारपासून (दि. २३) अर्ज विक्रीला सुरुवात झाली. शिवाजी विद्यापीठाच्या निवडणुका महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार घेण्यात येणार आहेत. एकूण उमेदवार दाखल केलेल्या तीस अर्जांमध्ये नोंदणीकृत पदवीधर गटांत-१२, अभ्यास मंडळे विभागप्रमुख गट-११, विद्या परिषद शिक्षक-३, प्राचार्य-१, व्यवस्थापन परिषद-१, शिक्षक-२ आदींचा समावेश आहे. ३१ ऑक्टोबरपर्यंत अर्ज भरण्याची मुदत आहे. ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज माघारीची मुदत असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 OCT 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'सिनेट'साठी ३० अर्ज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या सिनेट सदस्यत्वासाठी १७ नोव्हेंबरला होणाऱ्या निवडणुकीसाठी सहा गटांतून ३० अर्ज दाखल झाले आहेत. यापैकी नोंदणीकृत पदवीधर गटातून सर्वाधिक १२ अर्ज दाखल झाले असून विद्यापीठ शिक्षक या गटातून एकही अर्ज दाखल करण्यात आलेला नाही. दरम्यान अर्ज विक्रीच्या पाच दिवसात ९१२ अर्जांची विक्री झाली. अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 OCT 2017
लोकमत

# 'कलाप्रबोधिनी'द्वारे तीन नवे अभ्यासक्रम नोव्हेंबरपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या कलाप्रबोधिनीज इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन, कोल्हापूर या महाविद्यालयाच्यावतीने नोव्हेंबर पासून तीन नव्या अभ्यासक्रमांना सुरुवात करण्यात येणार आहे. संस्थेचे चेअरमन आर्कि. जयंत बेगमपुरे आणि मॅनेजिंग ट्रस्टी आर्कि. गिरिजा कुलकर्णी यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

सध्या महाविद्यालयामध्ये बॅचलर ऑफ डिझाईन (बी.डेस) इंटिरिअर हा चार वर्षांचा पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम चालविला जातो. आता नोव्हेंबरपासून ज्वेलरी डिझाईन, सेट डिझाईन आणि कम्युनिकेशन स्कील अँड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट हे तीन नवे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. घरगुती ज्वेलरी व्यवसाय करणाऱ्यांना संगणकीकृत ज्ञानाची गरज असते. त्यांच्यासाठी ज्वेलरी डिझाईन हा, तर विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक यांच्यासाठी कम्युनिकेश स्कील अँड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत. बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

भालजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्र आणि कलाप्रबोधिनीच्या संयुक्त विद्यमाने सेट डिझाईन हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल. एक वर्षाचा असलेला हा अभ्यासक्रम कुठल्याही शाखेच्या पदवीधरांसाठी असेल. अधिक माहितीसाठी महावीर उद्यानाजवळील संस्थेच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. यावेळी विजय गजबर, श्रीकांत डिग्रजकर, प्रा. केदार कुलकर्णी, प्रा. डॉ. हिमांशू स्मार्त, प्रा. योगिनी कुलकर्णी, आर्कि. कविता बंकापुरे उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 OCT 2017
सकाळ

# कलाप्रबोधिनी इन्स्टिट्यूटतर्फे नोव्हेंबरपासून नवीन कोर्सेस

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठ संलग्नित कलाप्रबोधिनीज इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन महाविद्यालयाद्वारे नोव्हेंबरपासून नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. यात ज्वेलरी डिझाईन, सेट डिझाईन, कम्युनिकेशन स्कील ॲण्ड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट या शॉर्ट टर्म अभ्यासक्रमांचा समावेश आहे. सध्या महाविद्यालयात बॅचलर ऑफ डिझाईन (बी.डेस.) इंटिरिअर हा चार वर्षांचा पूर्णवेळ डिग्री कोर्स चालविला जातो. विद्यार्थी, व्यावसायिक, प्रोफेशनल्स, महिलांसाठी नवीन कोर्सेस घेण्यात येतील, अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

सेट डिझाईन हा कोर्स एक वर्षाचा असून, २५ ते ३० हजार; तर ज्वेलरी डिझाईन, कम्युनिकेशन स्कील ॲण्ड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट या कोर्सेसना दहा हजार रुपये शुल्क असेल. प्रवेश क्षमता २० असेल. आठवड्यातून तीन दिवस तीन तास याप्रमाणे कोर्स घेण्यात येतील. भालजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्र आणि कलाप्रबोधिनीतर्फे कलादिग्दर्शन, सेट डिझाईन या अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्षाचा असेल. यासाठी कोणत्याही शाखेचा पदवीधर अशी पात्रता आहे. चित्रपट, नाटक, टेलिव्हिजनबरोबर इव्हेंट्‌समध्येही कलादिग्दर्शकांना व्यवसायाच्या विपुल संधी आहेत. पत्रकार परिषदेला कलाप्रबोधिनीचे अध्यक्ष आर्किटेक्ट जयंत बेगमपुरे, कलाप्रबोधिनी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईनच्या मॅनेजिंग ट्रस्टी आर्किटेक्ट गिरिजा कुलकर्णी, प्रा. केदार कुलकर्णी, प्रा. डॉ. हिमांशू स्मार्त, प्रा. योगिनी कुलकर्णी, कविता बंकापुरे, ट्रस्टी आर्किटेक्ट विजय गजबर, श्रीकांत डिग्रजकर आदी उपस्थित होते.

2 8 OCT 2017 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# YCMOU gets UGC permission to re-introduce PhD & MPhil courses

Chaitanya.Deshpande
@timesgroup.com

**Nashik:** The Yashwantrao Chavan Maharashtra Open University (YCMOU) received University Grants Commission (UGC) permission on Friday to re-introduce Doctor of Philosophy (PhD) and and Master of Philosophy (M Phil) courses.

Encouraged by the UGC's nod, the open university is in process of restarting the enrollments for PhD courses from the next academic session. According to the UGC circular, PhDs done by regular mode will be recognised and distance programmes were not. So, the YCMOU offered the full-time PhD program at schools of YCMOU at the university head office in Nashik.

According to this new decision, doctoral research opportunities will be available for academicians across the state in various subjects at the Open University. Research opportunities are available at the university after a gap of five years. The UGC had stopped the PhD courses in YCMOU citing various reasons in 2012.

"The UGC approval will definitely provide the higher education and research opportunities to hundreds of students across the state. The open university will follow the instructions and regulations of the UGC to run PhD as well as the MPhil degree courses according to new directives issued in 2016," said Dinesh Bhonde, YCMOU registrar said.

YCMOU's PhD course was popular among working academicians. Over 250 individuals had received PhDs in various subjects by 2012. However, the open university had to stop accepting new enrollments of the students for PhD courses from 2012-13 after the University Grants Commission (UGC) issued a circular that degrees granted for PhD programmes done through distance education will not get recognition.

Even if the open university had to stop new enrolment for the PhDs, the already enrolled students were allowed to carry on their research work with extensions. According to the records provided by the exam department, the YCMOU awarded PhD to 17 students in 2016-17. Similarly, 30 students got their PhDs in 2015-16. In 2014-15, the university had awarded PhDs to 54 scholars. "Stopping PhD enrollment was a completely technical issue and was part of the UGC's measures undertaken to maintain standards in higher education. As we are allowed to conduct PhD and M Phil courses now, we hope to restart PhD courses in the coming academic session," Bhonde added.

In 2018-19, the YCMOU is most likely to offer PhD Courses in education, humanities and social sciences, commerce and management, continuing education, agricultural sciences and some other non-technical fields as these non-technical courses do not necessarily require laboratories and practical exams.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 OCT 2017
Times of India

# SUK will offer 14 new short term courses

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) is offering 14 new short term courses (STC) at its advanced technology training centre from the next academic year.

According to a university official, the courses are for mechanical, production, civil, and electronics and communication engineering.

According to an official circular, admissions will be granted to eligible candidates on first come first serve basis. It added that the students from diploma or degree courses in mechanical, production, automobile, electronics and communication or instrumentation engineering can apply for the courses either on full-time or part-time basis.

Another university official said, the university has already signed a memorandum of understanding (MoU) with Indo-German Tool Room (IGTR)-Aurangabad last year in May. A formal nod form the SUK's council members sped up the process for setting up the advance technology centre at university campus.

However, the place for setting up the centre is still being identified. The official informed that temporarily the courses can start at the internet unit of the main library of the varsity.

IGTR is an International Organization of Standardization (ISO) certified Tool Room and Training Centre, which was established in 1990 and is the symbol of Indo-German co-operation aimed at promoting purposeful technical education among the youth in India.

"The presence of IGTR centre at the university will be enhancing the skill based learning. This will give the university a chance to develop skilled manpower." he further added.

"The university is prepared to provide education better and skilled worforce not just to the country but to the entire world," he said.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 OCT 2017
Times of India

# Shivaji Univ to apply for NIRF 2018 iteration

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will apply for the 2018 iteration of the National Institutional Ranking Framework (NIRF), officials said.

D T Shirke, pro-VC, SUK, said that the university had also applied for the first ever NIRF in 2016 and bagged 28th rank. However the university did not apply for the ranking next year.

According to Shirke, the university authorities have already started the work regarding the application. "A separate cell which has been formed will look into the requirements of the applications," he said.

"Improvements done for NIRF will be helpful for the university in during next re-accreditation cycle with the National Assessment and Accreditation Council (NAAC) scheduled in 2019," Shikre added.

Devanand Shinde, vice chancellor of the university, who is also the acting vice chancellor of Mumbai University, said that the first NIRF gave much needed idea of where and how to improve in the academics and administration.

SUK had bagged 28th rank in the first NIRF ranking announced in the year 2016. A Bengaluru-based Indian Institute of Science (IISc) had bagged the top position in the top 100 university ranking released by the centre.

Indian Institute of Technology (IIT) Madras came in a close second. Pune's Savitribai Phule Pune University was ranked 10th in the top universities list and 18th among overall academic institutions.

Delhi's Jawaharlal Nehru University (JNU) was ranked number six and Jadavpur University was ranked number 12 in the university rankings announced by the union ministry of human resource development (MHRD).

NIRF was launched by the Ministry of Human resource development (MHRD) in the year 2015. The main objective of launching the NIRF was to have indigenous ranking for the institutions across the country.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 OCT 2017
Times of India

# SUK asked to submit MIS data

Times News Network

**Kolhapur:** The Directorate of Higher Education (DHE) has asked the Shivaji University, Kolhapur (SUK) to submit the Management Information System (MIS) data of its affiliated colleges for the academic year 2017-18 by November 30.

MIS covers information from all the higher education institutions in the state.

In an official circular, dated October 24, the SUK has instructed its affiliated colleges to fill in the MIS details before the deadline.

In order to make the information submission procedure simple, according to a university official, the university generally conducts the workshop related to updating information on MIS portal.

"Colleges will have to submit the information on the web portal, www.dhemis.maharashtra.gov.in. They can also contact 0231-2609147 number to clear any doubts," the university circular said.

**The details are important, as the information is used in forming policies on creating skilled manpower and development in the higher education sector in the country.**

MIS data is collected on several parameters such as teachers, student enrolment, programmes, examination results, education finance, and infrastructure etc.

The details are important, as the information is used in forming policies on creating skilled manpower and development in the higher education sector in the country.

The officials have insisted on filling accurate information in terms of facts and figures. "The information is generally used at the informed policy making level. Thus, colleges need to be extra careful, while submitting the data," a university official said.

SUK has 283 affiliated colleges across the Sangli, Satara and Kolhapur districts, with more than three lakh students enrolled in various under-graduate and post-graduate courses.

The Directorate of Higher Education (DHE) of the state government had earlier presented a letter of appreciation to the university for its outstanding contribution in MIS data collection in 2013.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 OCT 2017
तरुण भारत

# पंडित आवळीकर काव्य पुरस्कारासाठी आवाहन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे मराठीत प्रसिध्द झालेल्या काव्यसंग्रहाला पंडित आवळीकर काव्य पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. प्रा. पंडित आवळीकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पुरस्कारासाठी दोन कविता संग्रहाची निवड करण्यात येणार आहे. सन २०१४ व २०१६ या कालावधीत प्रकाशित झालेल्या कविता संग्रहाचा विचार या पुरस्कारासाठी करण्यात येईल. इच्छुकांनी आपल्या कवितासंग्रहाच्या दोन प्रती मराठी अधिविभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या पत्यावर ३० नोव्हेंबरपर्यंत पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 OCT 2017
लोकमत

# विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे आवाहन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे प्रा. पंडित आवळीकर स्मृतिप्रीत्यर्थ मराठीत प्रसिद्ध झालेल्या काव्यसंग्रहास पंडित आवळीकर काव्य पुरस्काराने सन्मानित केले जाते. यावर्षी संबंधित पुरस्कारासाठी दोन कविता संग्रहांची निवड केली जाणार आहे. इच्छुकांनी अधिक माहितीसाठी शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी पत्रकाद्वारे केले आहे.